# 2018-19

| Sr. No. | Name of the teacher | Title of the book / chapters published | Title of the paper | | Year of publication | ISBN number of the proceeding | Affiliating Institute at the time of publication | Name of the publisher |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Dr. Mokashi S.A. | पटकथा लेखन - डॉ. रंजना नेमाडे | 15-Aug | पंधरा ऑगस्ट | 2018-19 | 978-93-81447-77-2 | Arts and Commerce College, Mayani | Muktarag Prakashan Latur |
| 2 | Dr. Mokashi S.A. | Vednancha Hunkar | Avkali Vilkha : Krushi Vednancha Sapna Avishkar | अवकाळी विळखा | 2018-19 | 978-938-81831-79-3 | Arts and Commerce College, Mayani | Gavali Prakashan Islampur |
| 3 | Dr. Mirajkar S.B. | Samajik Chalval Ani Vartman Avhane | Phule Ambedkari Chalval Ani Vartman Avhane | फुले, आंबेडकरी चळवळ आणि वर्तमान आव्हाने | 2018-19 | 978-93-82451-71-06 | Arts and Commerce College, Mayani | Naga-Nalanda Prakashan Islampur |
| 4 | Dr.Mokashi S.A. | Tifan | Navya Kathecha Sangava | Navya Kathecha Sangava | 2018-19 | 2231-573X | Arts and Commerce College, Mayani | Shivaji Bhikaji Huse |
| 5 | Dr. Mokashi S.A. | Ved Loksahityacha | Mandeshi Maulichya Gala | माणदेशी माऊलीच्या गळा | 2018-19 | 978-93-8665-18-1 | Arts and Commerce College, Mayani | Sayan Prakashan |

# पटकथा लेखन

डॉ. रंजना नेमाडे



## अनुक्रमणिका

प्रस्तावना / ५

मनोगत / ८

प्रकरण १ ले

पटकथा आणि इतर वाङ्मय प्रकार / ११

प्रकरण २ रे

पटकथालेखनाची पूर्वतयारी/ १९

प्रकरण ३ रे

यंत्राची ओळख/ २५

प्रकरण ४ थे

पंधरा ऑगस्ट/३२

प्रकरण ५ वे

पंधरा ऑगस्टची पटकथा /४१

प्रकरण ६ वे

पटकथेत रूपांतर करताना/६२

पारिभाषिक शब्द / ६९

संदर्भग्रंथ / ७१

प्रकरण ४ थे

# पंधरा ऑगस्ट

डॉ. सयाजीराजे मोकाशी

**ब**घता बघता दिवस कलला, उन्हाचा जोर कमी झाला. हळूहळू मावळतीला आभाळ गोळा होऊन अंधारून येऊ लागलं. एवढ्यात शाळेची घंटा होऊन कोंडवाड्यातून वासरं बाहेर पडावीत तशी पोरं बाहेर पडली. मोकळी होऊन दप्तर उचलून घराच्या वाटंला लागली. मागोमाग गुरूजींनीही न चुकता घरचा रस्ता धरला. पोरांच्या गोमकाल्यातून त्यांनीही आपली सुटका करून घेतली. शाळा सुटल्यानं अन् सुसाट पळणाऱ्या पोरांच्या दंग्यामुळे गावभर चैतन्य निर्माण झालं. जवळच्या रस्त्यानं लवकर घरी जाण्याची घाई त्याना झाली होती. रानामाळात घरी जाणारी पोरं पाठमोरी बघत वस्तीच्या वाटंला लागली. अंधाराआधी घरी गेलं पाहिजे, म्हणून ती गडबडीने वाट तुडवित होती. नुकताच पाचवीत गेलेला दिगू अन् त्याच्या मागं चालणारी तिसरीत शिकणारी त्याची बहीण सावित्री एकामागं एक वस्तीवर आली. त्यांनी दप्तरं उंबऱ्यातच ठेवली. दिगूनं हात मागं सारून रांजणातनं पाणी घेऊन हात धुतला. 'आय मला भूक लागलिया जेवाय वाढ'. असं म्हणत घरात शिरला.

शिवा नुकताच वैरणीचा भारा घेऊन आला होता. त्यानं भारा खाली टाकून त्यालाच तो टेकून बसला होता. आंगावरचं वैरणीचं पाल झाडून त्यानं खिशात हात घातला. तंबाखू तळहातावर घेतली. त्यातली काटकं कुटकं बाजूला करून चुना घेऊन तंबाखू मळू लागला. तसा दिगू तेल लावलेली बाजरीची भाकरी हातात घेऊन, तोडून खात बाहेर आला. शिवाजवळ तो येऊन बसला आणि अचानक आठवून तो म्हणाला.

''अण्णा''


''काय?''

''शुक्रवारी पंदरा आगस्ट हाय''

''बरं मग?''

## अवकाळी विळखा

# शेतकरी वेदनेचा हुंकार




संपादन

**राजेंद्र शंकर गवळी**

# अंतरंग


* ग्रामीण जीवनाचा वेध घेणारी कथा : अवकाळी विळखा
– उमेश मोहिते ........................................................ ११
* ग्रामीण जीवनातील समकालीन वास्तव व समस्यांचा समग्र आढावा : अवकाळी विळखा – डॉ. राहुल अशोक पाटील ........................ १६
* अवकाळी विळखा : कृषी वेदनेचा संपन्न आविष्कार
– डॉ. सयाजीराजे मोकाशी ........................................... २३
* अक्षरांचे अक्षय देणे : अवकाळी विळखा – सरिता पवार ............... २९
* अवकाळी विळखा : शेतकरी वेदनेचा हुंकार – हिंमत पाटील ............ ३५
* वर्तुळाबाहेरील कथा : अवकाळी विळखा – रंगराव बापू पाटील ....... ४१
* ग्रामजीवनाचे वास्तव : अवकाळी विळखा – राजेंद्र भोसले ............ ४५
* बळीराजाला पडलेला : अवकाळी विळखा – विजय कापडी ............ ५१
* एक आश्वासक ग्रामीण कथासंग्रह : अवकाळी विळखा– संदीप नाझरे.. ५४
* मातीतल्या नात्यांना सावरणारा कथासंग्रह : अवकाळी विळखा
– सुनील जवंजाळ ........................................................ ६१
* व्यथा बळीराजाची : अवकाळी विळखा – आनंदा टकले ............... ६४
* शेतकऱ्यांच्या काळीज व्यथा : अवकाळी विळखा– महादेव बुरूटे...... ६८
* काळावर आसूड ओढणाऱ्या कथा : अवकाळी विळखा
– हरिश्चंद्र पाटील ....................................................... ७१
* व्यथा शेतकऱ्यांच्या : अवकाळी विळखा– प्रा. बाबासाहेब देविकर.... ७७
* कृषीमनाच्या कोंडमाऱ्याचा प्रभावी वेदनाविष्कार
– डॉ. सयाजीराजे मोकाशी ........................................... ८६
* 'अवकाळी विळखा' मधील स्त्री सहनायिका – कल्पना पाटील ......... ९२
* शेतकऱ्यांच्या व्यथा मांडणाऱ्या कथा : अवकाळी विळखा
– डॉ. अजित पुरोहित ................................................. ९७

# घुसमट : कृषीमनाच्या कोंडमाऱ्याचा प्रभावी वेदनाविष्कार

– डॉ. सयाजीराजे मोकाशी.

**म**हानगरे वाढताना ती शेजारी असणाऱ्या जवळ असणाऱ्या खेड्यांच्या नरड्यावर पाय देतात. तेथील ग्रामसंस्कृती, रितीरिवाज, परंपरा यांना सुरूंग लावतात. शहरे फोफावताना ती सर्वप्रथम शहरालगतच्या गरीब शेतकऱ्यांच्या जमीनी कवडी मोलाने बळकवतात. पिढ्यान् पिढ्या घाम गाळणाऱ्या शेतकऱ्यांना हाताला धरून बांधाबाहेर काढतात. भूमिहीन बनवतात.

कालांतराने त्याच शहरातील फुटपाथवरचे जगणे त्यांच्या वाटणीला येते. चकचकीत रस्त्यांच्या झगमगाटी बाजारी दुनियेत या शेतकऱ्यांचे कष्टकऱ्यांचे अन् शेतमजुरांचे नेमके पुढे काय होते? याचे उत्तर येणाऱ्या काळाच्या उदरात दडलेले असते. एवढेच मात्र खरे! या दृष्टीने श्री. सचिन वसंत पाटील यांच्या 'अवकाळी विळखा' या कथासंग्रहातील 'घुसमट' या कथेचा थोडक्यात परामर्श घ्यावयाचा आहे.

सतराशे साठ पिढ्यातील परंपरेत असणारा, दर पावलाला मनाची घुसमट अनुभवणारा विलास हा नव्या काळातील पदवीधर शेतकरी आहे. आजोबा वडील स्वत: अन् त्याचा मुलगा या बदलत्या पिढ्यांची मानसिकता कथाकार नोंदवितात. शेतावर चाळीस हजाराचे कर्ज काढून बजाजची प्लॅटीना गाडी घेण्याचा हट्ट करणारा मुलगा अन् रोजचा खर्च कसा भागवायचा या विचारात पडलेला विलास ही दोन भिन्न टोके कथेत संघर्ष निर्माण करतात. पैसे नसल्यामुळे सायकलचे मोडके चाक बदलता येत नाही. मुलीच्या लग्नासाठी काढलेले कर्ज भागविताना विलासची दमछाक होते. आपल्या असंख्य पिढ्या शेतात राबल्या पण घर तेच राहिले, डोईवर कर्ज तसेच राहिल्यामुळे कौलाखालची जुनी आढी तीच राहिली. शेतीला भांडवल नाही. खायला प्यायला चांगले नाही. पोटाची समजूत घालून येणारा दिवस ढकलणे सुरू आहे. विलासला पोराचा राग येतो. रान विकायचे पाप आपण करायचे नाही, असे त्याला वाटते पण दुसऱ्या बाजूने पाहिले तर त्याला वाटते, आपल्या आयुष्याची जी माती झाली, तशी आबदा आपल्या लेकरा बाळांची होऊ नये यासाठी याचा जीव तडफडतो.

भारतीय शेतकरी आपल्या कष्टाबरोबर तो थोडा अधिक दैववादी आहे.

20

# सामाजिक चळवळी आणि वर्तमान आव्हाने

संपादक : डॉ. प्रकाश दुकळे





प्रा. विजयकुमार जोखे गौरवग्रंथ

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| भूमिका | डॉ. प्रकाश दुकळे | ९ |

**विभाग एक :**

| | | |
|---|---|---|
| चळवळींचा आत्मा आणि सांस्कृतिक सिद्धातांचा दुष्काळ | डॉ. आनंद पाटील | १७ |
| अंनिस, डॉ. दाभोळकर आणि नंतर... | डॉ. राजेखान शानेदिवाण | ४२ |
| पुरोगामी चळवळ आणि जमातवाद | किशोर बेडकिहाळ | ६४ |
| राज्यघटना आणि विवेकवाद | डॉ. हमीद दाभोळकर | ८३ |
| जातीअंत आणि शरण चळवळ | कॉ. धनाजी गुरव | ९९ |
| फुले-शाहू-आंबेडकरी चळवळ आणि वर्तमान आव्हाने | डॉ. श्यामसुंदर मिरजकर | ११५ |
| पर्यावरण चळवळीपुढील आव्हाने | उदय गायकवाड | १२२ |
| सहकार-जागतिकीकरणातील दीपस्तंभ | डॉ. विजय ककडे | १२७ |
| जात शोषणाला लगाम | कृष्णा चांदगुडे | १३१ |
| सत्यशोधक चळवळ व समकालीन प्रस्तुतता | डॉ. अरुण कृष्णा शिंदे | १३८ |
| मुस्लीम सत्यशोधक चळवळ पन्नाशीकडे जाताना... | डॉ. शमशुद्दिन तांबोळी | १५० |
| सामाजिक चळवळी व माध्यमांची भूमिका | प्रसाद माधव कुलकर्णी | १५९ |
| विज्ञान चळवळ आणि वैज्ञानिक दृष्टिकोन | डॉ. शिवकुमार सोनाळकर | १६७ |
| सीमाप्रश्नाची चळवळ आणि वर्तमान वास्तव | डॉ. जी. पी. माळी | १८४ |
| साहित्य, सांस्कृतिक चळवळी आणि मराठी साहित्य | डॉ. नंदकुमार मोरे | १९२ |
| आदिवासी चळवळ आणि वर्तमान आव्हाने | डॉ. दीपककुमार वळवी | २०१ |
| प्रबोधन चळवळींची सद्यस्थिती | डॉ. रमेश साळुंखे | २०६ |
| लिंगायत चळवळ | सिद्धमल्लया हिरेमठ | २१४ |
| सडक नाटकांची शताब्दी | योगेश कुदळे | २२१ |
| सत्यशोधकीय स्त्रीवाद आणि वर्तमान आव्हाने | डॉ. मांतेश हिरेमठ | २३२ |
| तीर्थंकर महावीरांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन | डॉ. नीता विजयकुमार जोखे | २४७ |
| दूध दर आंदोलन आणि शेतकरी चळवळ | प्रा. डी. आर. पाटील | २५६ |
| वाचनसंस्कृती आणि वाचन चळवळ | डॉ. प्रकाश दुकळे | २५९ |

# फुले-शाहू-आंबेडकरी चळवळ आणि वर्तमान आव्हाने

डॉ. श्यामसुंदर मिरजकर

आधुनिक भारताचा इतिहास हा प्रबोधन आणि आत्मसन्मानाच्या चळवळींचा इतिहास आहे. इंग्रजपूर्व काळात पारंपरिक सनातनी धर्मव्यवस्था प्रबळ होती. ती मुस्लीम शासकांनाही आपल्या सामाजिक-धार्मिक व्यवस्थेत हस्तक्षेप करू देत नव्हती. सम्राट अकबर किंवा दाराशुको सारख्या मुस्लीम राजांनी धार्मिक संघर्षाला पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला होता. परंतु तो यशस्वी झाला नाही. भारतात वेळोवेळी सत्ताधारी राज्यकर्ते बदलले, परंतु गावगाडा, जातिव्यवस्था यांना धक्का पोहोचला नाही. इंग्रजांच्या आगमनानंतर मात्र इथल्या गावगाड्यात धर्म व समाज व्यवस्थेत हस्तक्षेप सुरू झाले. प्रेम, करुणा व सेवाभाव ही मूल्ये सांगणाऱ्या ख्रिश्चन राज्यकर्त्यांनी मानवी मूल्यांची चर्चा सुरू केली. स्वार्थमूलक धर्मव्यवस्था व अंधश्रद्धा यांच्याबद्दल प्रश्न उपस्थित केले. त्यामुळे धर्मचिकित्सेचे, विचारांचे एक युग सुरू झाले. म. फुले, राजर्षी शाहू व डॉ. आंबेडकर यांना या नव्या जगाचा परिचय होता. अभ्यास व चिंतनातून त्यांनी आत्मभान मिळविले. भारतीय समाजव्यवस्थेत बदल व्हावेत म्हणून जाणीवपूर्वक प्रयत्न सुरू केले. फुलेंनी मुली आणि अस्पृश्यांसाठी शाळा उघडल्या. शाहूंनी आपल्या संस्थानात शिक्षण सक्तीचे केलेच, पण शिक्षणाला प्रोत्साहन म्हणून 'ब्राह्मण, प्रभू, शेणवी, इंग्रज आदी पुढारलेल्या जातींना वगळून इतरांसाठी' नोकरीतील ५०% जागा राखीव ठेवल्या. तर डॉ. आंबेडकरांनी 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असे सांगून सर्वांना घटनात्मक मानवी


ISSN 2231-573X
तिफण
वर्ष : ९ वे, अंक : ३ रा, ऑक्टोंबर ते डिसेंबर – २०१८



ISSN 2231-573X

साहित्य, कला आणि
लोकसंस्कृतीला वाहिलेले

त्रैमासिक

# तिफण

वर्ष : नववे, अंक : तिसरा
ऑक्टोबर ते डिसेंबर - २०१८

**संपादक :**
**प्रा. शिवाजी भिकाजी हुसे**
मो. : ९४०४०००३९८

**संपादक मंडळ :**
डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. प्रकाश खेत्री,
डॉ. सर्जेराव जिगे, डॉ. कैलास दौंड,
प्रा. संजय भालेराव, प्रा. आर. व्ही. वाघमारे
डॉ. तुषार चांदवडकर, डॉ. राजेंद्र चौधरी,
डॉ. रामनाथ वाढे, शफी बोल्डेकर

**मुखपृष्ठ :** अक्षदा ॲडस्
**मुद्रक :** रुद्रायणी, औरंगाबाद.
**मुद्रितशोधन :** प्रा. राम गायकवाड

**अक्षर जुळणी, मांडणी व सजावट :**
नीट एन्टरप्रायजेस, औरंगाबाद.
फोन : ९८५०८२६१०१

*** वर्गणी ***
वार्षिक : २००, आजीव : २०००
वर्गणी अशीही भरता येईल -
संपादक, 'तिफण', बँक ऑफ महाराष्ट्र
शाखा कन्नड, खाते क्र. 60287405377
आय.एफ.सी. कोड क्र. MAHB0000259

**स्वागत मूल्य :** ५० रु.

संपादनः अवैतनिक

**साहित्य व वर्गणी पाठविण्याचा पत्ताः**
संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी,
हिवरखेडा रोड, कन्नड-४३१ १०३
ता. कन्नड, जि. औरंगाबाद
E-mail - huseshivaji@yahoo.com

(या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे; परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

# अनुक्रम


* गुण गाईन आवडीच्या निमित्ताने .................................... ३
  – *नागनाथ कोत्तापल्ले*
* रणांगणावर ललकारणारी कविता .................................... ११
  – *डॉ. जनार्दन वाघमारे*
* नव्या कथेचा सांगावा .................................... १७
  – *प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी*
* संत साहित्यातील कृषी संस्कृतीचा घेतलेला शोध .................................... २२
  – *प्रा. बाबुराव उपाध्ये*
* 'आभाळवाटा' : मानवमुक्तीचा सम्यक जाहीरनामा .................................... २५
  – *प्रा. मीनल येवले*
* 'अंदमानचा प्रवास' च्या निमित्ताने ... .................................... २९
  – *देवीदास शिंदे*
* स्त्रीमनाचा मुक्त संवाद : 'सामर्थ्य आहे तुझ्यातही' .................................... ३४
  – *प्रा.डॉ. संतोष चव्हाण*
* वंचितांच्या वेदनांचा डोळस ताळेबंद : 'फेसाटी' .................................... ३८
  – *प्रा. बी. एन. चौधरी*
* डोळस जीवन जगणारा माणूस .................................... ४४
  – *प्रा. शिवाजी वाठोरे*
* पांडा तात्या .................................... ५०
  – *अंकुश गाजरे*
* 'आई! मला जन्म घेऊ दे' .................................... ५७
  – *प्रा. वा. ना. आंधळे*
* शेतकरी डिजिटल झाले (कविता) .................................... ६१
  – *कवी अर्जुन देशमुख*

# नव्या कथेचा 'सांगावा'

**- प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी**


**भा**रतातील बहुसंख्य लोक खेड्यांत राहतात, 'निसर्गाकडे चला' या महात्मा गांधीच्या आवाहनास प्रतिसाद देऊन अनेक शहरवासी लोक निसर्गाकडे वळाले. खेड्यांतील खूप मोठे जग अजूनही साहित्याचा विषय झाले नव्हते. तेथील शेती, निसर्ग, जीवन पद्धती आकारास आलेली समाजरचना आणि त्यात पिढ्यानपिढ्या जीवन जगणारा माणूस साहित्याच्या केंद्रस्थानी आला आणि ग्रामीण साहित्य उदयास आले.




स्वातंत्र्य प्राप्तीसाठी सुरू असलेली देशव्यापी चळवळ आणि ग्रामीण भागातील शिक्षण प्रसार यामुळे देशभर समाज जागृती होऊ लागली. स्वातंत्र्यानंतर व्यक्ती स्वातंत्र्याला महत्त्व आले. राज्यघटनेने जन सामान्यांना मोठेपणा, सन्मान बहाल केला. यातूनच ग्रामीण साहित्याच्या निर्मितीला मोठा आधार प्राप्त झाला. हरिभाऊ आपटे, वि. स. सुखटणकर, लक्ष्मणराव सरदेसाई, ग.ल.ठोकळ, ग.ह.पाटील, बहिणाबाई चौधरी, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, आनंद यादव, रा.रं. बोराडे, द.ता. भोसले, चारुता सागर, भास्कर चंदनशिव आदी लेखकांचे ग्रामीण साहित्य सुप्रतिष्ठित झाले. निसर्ग, कृषिनिष्ठा, गावगावाडा, ग्रामीण बोली, ग्रामीण कुटुंब व्यवस्था, ग्रामसंस्कृती, आदिमतेकडे झुकणारा कल आणि प्रादेशिक बोली ही ग्रामीण साहित्याची वैशिष्ट्ये सांगितली जातात.

# वेध लोकसाहित्याचा

## प्राचार्य डॉ. शोभा बाळासाहेब इंगवले एकसष्टीपूर्ती गौरवग्रंथ



संपादक

डॉ. पांडुरंग भोसले । डॉ. महालक्ष्मी मोराळे

Scanned with OKEN Scanner

| अनुक्रम |


• संपादकीय ११

• प्रस्तावना १३

१. लोकसाहित्य : संकल्पना, स्वरूप आणि परंपरा १९
डॉ. महालक्ष्मी मोराळे

२. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती ५२
प्राचार्य डॉ. शोभा इंगवले, डॉ. लीला वेदपाठक

३. लोकसाहित्याचा अभ्यास: वाङ्मयीन दृष्टिकोनाची गरज ९७
डॉ. गो. मा. पवार

४. महात्मा जोतीराव फुले आणि लोकपरंपरा १०५
डॉ. विश्वनाथ शिंदे

५. लोकसाहित्यातील कथनविशेष १२४
डॉ. रणधीर शिंदे

६. माणदेशी लोकसाहित्य १३६
प्राचार्य डॉ. कृष्णा इंगोले

७. लोकसंस्कृती आणि लोकदैवते १५८
डॉ. द. ता. भोसले

८. माणदेशी माउलीचा गळा १७७
प्राचार्य डॉ. सयाजीराजे आ. मोकाशी

९. लोकसाहित्य अध्ययनाच्या दिशा १८३
डॉ. सीमा नाईक-गोसावी


Scanned with OKEN Scanner

# ८. माणदेशी माउलीचा गळा

प्राचार्य डॉ. सयाजीराजे मोकाशी

माझं गाव माणदेशात शेटफळे. कायम दुष्काळ. पाण्याची, वैरणीची आबदा. शेळ्या-मेंढ्या माळा मुरडानानं फिरून जगणाऱ्या, कुणाच्याच जगण्यात रया नसल्यागत. गुरं-ढोरं कशीतरी पोटाची समजूत काढणारी, कुणी म्हातारी म्हणायची, 'ह्यो माणदेश म्हंजी डवऱ्या घडश्यांचा, मागतकऱ्यांचा मुलुख हीत सदुनिक हीच बोंब असतीया. कसं जगायचं का मरायचं?'

माझ्या लहानपणी आमच्या गावावर म्हटलेलं एक गाणं मला आठवतं,

'आटपाडी बाजारं, करगणी शेजार,
माळेवाडी, पात्रेवाडी टिळा कपाळी
अन् पठ्ठ्याचं शेटफळं तलवार खेळी'

माझ्या गावाच्या चारी बाजूनी सात वाड्या, सात फुलांच्या पाकळ्यांप्रमाणे आहेत. त्यात मध्ये माझे गाव वसलेले आहे. शेठ, सावकार, प्रतिष्ठितांचे हे गाव म्हणून शेटफळे. या गावात जन्मलेले महाराष्ट्र वाल्मिकी ग. दि. माडगूळकर म्हणत 'गावाचे नाव बदला. परंतु ते घडले नाही. हे गाव कुस्तीगिरांचे, मल्लांचे आहे. महाराष्ट्र प्रसिद्ध खीर नाथ अष्टमीला असते. वासुदेव मंदिर, श्री सिद्धनाथ मंदिर आणि स्त्रियांची

पडदाशीनं गोशापद्धती ही काही वैशिष्ट्ये गावाची आहेत.

आमच्या गावातील स्त्री जरी गोशात असली तरी तिचा चांगला सन्मान करण्याची प्रथा पिढ्यांन्‌पिढ्या चालत आली आहे. येथील कोणत्याही घरात लग्न होऊन, वरातीतून घराचा उंबरा ओलांडून आत आलेली स्त्री, मृत्यू झाल्यानंतरच दिसत असे. माझ्या वडिलांची पहिली आई डॉक्टर वैद्याला हात तपासायला द्यायला तयार नव्हती. ती म्हणाली, 'हात एकालाच (नवऱ्याला) दिला. पुन्हा दुसऱ्याला नाही देणार!' अखेर ही आजी रक्ताचा कॅन्सर होऊन मरण पावली. माझी आई म्हणायची,

**'अहेव मरणाची । आहे माझ्या माहेराची चाल ।**
**माझ्या लाड्‌क्या सासूने । इंद्रसभेला दिलं पाल ॥'**

माझ्या आईच्या माहेरी तीन पिढ्या अन् सासरी पाच पिढ्या स्त्रियांना आहेव मरण आल्याचा ती गौरवाने उल्लेख करी. कारण आहेव मरण हा स्त्रियांचा सन्मान असे तिला वाटे.

**'अहेव मेली नार । चोळी लुगडं दांडीवरी ।**
**शिर कंताच्या मांडीवरी ॥**
**अहेव मेली नार । तिचं पिवळं सराण ।**
**भरताराच्या आधी । डाव जितला नारीनं ॥'**

माझ्या आईचं माहेर जहागीरदारांचे तर वडील इनामदाराचे वंशज. दोघांच्या वतनामध्ये मोठा पूर्व पश्चिम डोंगर आणि जवळून जाणारी मिरज-बार्शी लाईट रेल्वे. आई जुनी सहावी शिकलेली, तेही हिंदीतून ग्वाल्हेरला. तिचे वडील रावसाहेब जहागीरदार जिवाजीराव शिंद्यांचे दरबारात सेनापती.

आई नाकेली, सावळी, उंच, शेलाटी, नाकी डोळी नीटस्, फट्‌कन बोलणारी, लगेच रागाला येणारी पण प्रेमळ. सगळ्या भावंडात माझ्यावर जास्त प्रेम करणारी. म्हणायची, 'तू नशिबवान आहेस. बापासारखी मुलगी अन् आईसारखा मुलगा नशिबवान असतात म्हणून.' मी लहान असताना यावर विचार करीत असे.

आई पंचांग पहायची. अनेक गोष्टी सांगायची. सोळा सोमवारच्या गोष्टी, सूर्यनारायणाच्या गोष्टी, आदित्य राणूबाई, दिव्याच्या गोष्टी,



Scanned with OKEN Scanner

वटसावित्रीची गोष्ट, शुक्रवारची कहाणी अशा असंख्य गोष्टी तिला पाठ होत्या. श्रावणात मार्गशिर्षात आणि पौष महिन्यात ती स्त्रियांना गोष्टी सांगे. मी तिच्या मागे सावलीसारखा असे.

आमचे घर मळ्यात, गावापासून दीड किलोमीटर अंतरावर. घरापाठीमागे छोटा डोंगर. समोर उंची मोठी झाडे. हिरवेगार बागायती क्षेत्र, गाई गुरांचा भरलेला गोठा, तीन बैल, काम करणारी गडीमाणसे, लक्ष्मी दाही दिशेला हात जोडून उभी. दारात छोटे दत्ताचे मंदिर. सगळी सुबत्ता, भरभराट, आनंद, उत्साह आणि आबादी आबाद.

देशी बेंदरानंतर गावातून शेवंताकाकीचा आईला निरोप येई. 'सुशालअक्काला गावात या म्हणावं.' बेंदरापासून नागपंचमीपर्यंत रोज दादाच्या अंगणात भावकीतल्या सगळ्या स्त्रिया गाणी म्हणायला येत. आई अनेक गाणी तिच्या गोड गाळ्यातून म्हणायची.

**'धौम्य ऋषा सांगतसे राम कथा पांडवा.'**

हे सुंदर चालीतील गीत आजही मला चांगले आठवते.

पुढच्या काळात घरोघर चहा शिजविला जाऊ लागला. त्यांची सगळ्यांना जणू सवयच जडली. त्यावरील प्रबोधनपर एक गीत मला आठवते.

**'बशीत घ्या तुम्ही चहा**
**चहाची मजा तुम्ही पहा'**

मग त्यावरील एक गंमतीशीर गीत,

**अशी कशी सवय जडली चहा घेण्याची ।। धृ. ।।**
**चहासाठी माडी पाडावी वरच्या मजल्याची**
**पावडरसाठी अंगठी मोडावी मधल्या बोटाची**
**दुधासाठी बायको विकावी पहिल्या लग्नाची**
**अशी कशी सवय जडली चहा घेण्याची ।। १ ।।**

आई जात्यावर दळण दळताना पहाटे खूपच सुंदर ओव्या म्हणत असे. आमच्या घरातील तीन जाती तीन वेगळ्या आकाराची होती. जात्याचा घरघर आवाज, ओव्या आणि पहाटेचे मंद वारे यामुळे ती वेळ आनंदमय, उल्हासदायक आणि प्रसन्न वाटे. मी आईच्या उजव्या मांडीवर

डोके ठेवून किती तरी पहाटे, किती तरी ओव्या लहानपणी मनात साठविलेल्या आहेत.

'पहाटेच्या पाऱ्यामंदी आधी देवाचे नांव घ्यावे,
मग चिंतल्या कामा जावे।'

कधी आई दळण दळून घामाने भिजून जाई. तिचा घाम माझ्या डोक्यावर, मानेवर ठिबकत राही.

'दळण दळताना चोळी भिजून पदर ओला
माऊलीच्या आकरी दुधाला कढ आला।'

कधी कधी आई या ओव्यात माझे आणि माझ्या भावंडांचे नाव गोवी. घरातील प्रत्येकाला त्यात स्थान देई. त्यामुळे माझ्या बालमनाला आनंद वाटे.

'बाळ माझा तो संजूबाबा ग
जसा जाळीतून सुटला वाघ'

मग मला बरे वाटे. आईचे कौतुकही वाटे.

घरापासून शाळा २ कि. मी. दूर. मी दप्तराचे ओझे वागवून रडकुंडीला येई. तेव्हा आई म्हणे,

'शाळेला जाताना तुला कशाचं रडू येतं
बाळाला माझ्या पाटी दप्तराचं ओझं हुतं'

माझ्या धाकट्या मामाला पहिल्या तिन्हीही मुलीच झाल्या. पुन्हा सरोजिनी मामी गरोदर राहिल्यावर आईने कोनाड्यात गणपतीला लिंपून ठेवले. पुन्हाही मामींना दोन जुळ्या मुलीच झाल्या. तेव्हा आईने नाराज मामांची समजूत काढली.

'लेकी झाल्या म्हणून नका खाली घालू मान
पुण्यात पुण्य तुम्हा घडेल कन्यादान ।'
'लेकीच्या आईला नका म्हणू ग हालकी
सांगा लेकाच्या आईला कुणी दिलीया पालखी?'

मामांच्या मुली मोठ्या झाल्यावर 'तुमच्या मुलांना करा' असे मामा म्हणाले तेव्हा,

'भाची सून करू नका
नाही तर बंधु तुटल प्राणसखा ।'



Scanned with OKEN Scanner

आई सासरी असल्यावर

'सणात सण नागपंचमी आली गेली
तेव्हाच आई मी दिवाळीची बोली केली ।'

मग मामा आईला माहेरी न्यायला तट्ट्याची सजविलेली गाडी घेऊन यायचा. कधी कधी मामाला आईकडे यायला जमत नसे. तेव्हा आई म्हणे,

'बहिणीच्या गावा जाया सांगतो बारा वडी
लेकीच्या गावा जाया औताची बैलं सोडी'

तर कधी आई वैतागून म्हणत असे,

'आताच्या जमान्यात भाऊ नव्हे बहिणीचा
खिशामध्ये चोळी वाडा पुसतो मेव्हणीचा ।'

आईचे माहेरी कौतुक करणारी आईची आई म्हणजे माझी आजी अंथरुणावर पडली. आईने अखेरपर्यंत शेंडफळ सासरी ठेवून सेवा केली आणि एक दिवस आजी मार्गशीर्ष महिन्यात वारली.

'आई वडिलांच्या माघारी कोण माहेरा गेली वेडी
कवटाळल्या खांब मेढी ।'

आईला माहेरी गेल्यावर अनेक स्त्रिया 'तुम्हाला मुले किती? असे विचारीत.

'माहेरा जाता सई विचारती मला 'तुम्हा ल्याक-लिकी किती?'
दोन पुतळ्या तीन मोती ।'

माहेरात आई आपल्या भावांना आणि भावजयींना एक विनंती करताना मी पाहिले आहे.

'नको ग वहिनी धन - मुद्रा आणि सर
आई बाबा संगे नुसती बोल तोंडभर ।'

अशी भावनिक होत असे.

आईची शंकर पार्वतीवर अधिक भक्ती होती.

'हात मी जोडते शेता मळ्या येता जाता
औक्ष लागू दे माझ्या कंताला सिद्धनाथा ।'

कधी कधी भांडखोर शेजारणीला आई म्हणे,

'दुबळ्या भरताराची नार करीती हेळना
कपाळीचं कुंकू सोनं दिल्यानं मिळंना ।'



Scanned with OKEN Scanner

मी अगदी लहान असताना मळ्यातून शाळेला जाई. एकदा मित्रांच्या संगतीने रस्त्यातले महादू बुवाचे हरभऱ्याचे डहाळे उपटले. हे आईला समजल्यावर तिने मला मार मार मारले.

'कोण आपलं कुळ, आपण इनामदार
बट्टा लागूने कुळाला नकू होऊस तू चोर'

एकदा गावात एका वाण्याच्या लग्नात पंक्तीत उकिरड्यावर लहानपणी मी जेवलो हे समजल्यावर आईने मला मारले आणि तीही मला पोटाशी धरून रडू लागली. म्हणाली, "पंक्तीतले जेवण गोरगरिबांसाठी असते. आपल्यासाठी नसते." तेव्हापासून मी पंक्तीत जेवण्याचे बंद केले.

'जुनं गेलं चाय फाय
नवं आलं घाय घाय'
'नवं मी नेसते, जुन्यावर देते पाय
घेणाऱ्याला औक्ष लय'

सामाजिक बदल सांगताना ती म्हणे,

'मतं दिली गांधीला
परकाळा पडला सांदीला'

आणि आमच्या गावातील गोशापद्धत हळूहळू बंद पडली.

आज आई नाही. परंतु तिचे रोज वापरायचे जाते आहे. ती जेथे बसायची ती जागा आहे. मुसळ, पाटा वरवंटा, पोथी आणि ताक घुसळायची रवी, डेरा सगळं आज जसंच्या तसं आहे. जातं पाहिलं की आईची आठवण डोळ्यांत पाणी आणते आणि तिच्या ओव्या मला आठवू लागतात. वाटते, 'कुठून तरी आई येईल आणि माझे डोके मांडीवर घेऊन ती ओव्या म्हणायला सुरुवात करील.' म्हणून मी कावरा बावरा होऊन सगळीकडे पहातो. मात्र दाही दिशा तोंड फिरवून गप्पगार असतात.

■



Scanned with OKEN Scanner